जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २११ | मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




# लोणी काळभोर आरोग्य केंद्राला राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार

## आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणालीत प्रभावी कामगिरी; डॉ. मेहबूब लुकडे यांची माहिती

**लोणी काळभोर, ता. २३ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला राज्य सरकारकडून देण्यात येणारा मनाचा राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. अशी माहिती लोणी काळभोर प्राथमिक आरोग्य आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी मेहबूब लुकडे यांनी दिली.

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सन २०२५-२६ या वर्षातील उत्कृष्ट आरोग्य सेवा, रुग्णाभिमुख उपक्रम आणि डिजिटल आरोग्य व्यवस्थापनातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत रविवारी (ता. २२) मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे वंदनीय बाळासाहेब ठाकरे




आरोग्य रत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२५-२६ या राज्यस्तरीय सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

यासाठी सेवा परिणामकारकता, मातामृत्यू व बालमृत्यू नियंत्रण, कुटुंब कल्याण कार्यक्रमांची अंमलबजावणी, शस्त्रक्रिया कार्यक्षमता, रुग्णसंख्या आणि डिजिटल आरोग्य जोडणी यांसारख्या महत्त्वपूर्ण निकषांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले. याच कार्यक्रमात महाराष्ट्र पॅलेटिव्ह केअर कार्यक्रमाचा शुभारंभ तसेच मेनोपॉज क्लिनिकचे राज्यस्तरीय लोकार्पण करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली भक्ती विठ्ठलाची, सेवा आरोग्याची या उपक्रमांतर्गत आळंदी-देहू ते पंढरपूर पालखी सोहळ्यात उत्कृष्ट नियोजन व नियंत्रण केल्याबद्दल जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राम चंद्र हंकारे, यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी उपसंचालक डॉ. भगवान पवार, तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ एमपल्ले, औंध यासह जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोय कर्मचारी, व आशासेविका उपस्थित होत्या. दरम्यान, आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली (एच.एम.आय.एस) मध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल लोणी काळभोर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मेहबूब लुकडे व वाघोली येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना गौरविण्यात आले. पुणे जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्याबद्दल आशा सेविका शोभा सोनबा खेडकर (रांजणगाव), त्यांच्या गट प्रवर्तक श्रीमती आशा सुर्वे तसेच जिल्हा समूह संघटक आशा श्रीमती कीर्ती तागड यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

> ‘ हा आरोग्यरत्न पुरस्कार म्हणजे लोणी काळभोर प्राथमिक आरोग्य यंत्रणेने गेल्या वर्षभरात घेतलेल्या कष्टाचे फळ आहे. आरोग्य विभागाच्या तळागाळातील कर्मचाऱ्यांपासून ते वैद्यकीय अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या सांघिक प्रयत्नांमुळेच आम्ही पुरस्काराचे मानकरी ठरलो आहोत. हा सन्मान आम्हाला भविष्यात अधिक दर्जेदार आणि लोकाभिमुख सेवा देण्यासाठी प्रेरित करेल. या पुरस्कारामुळे सर्व आरोग्य अधिकारी, कर्मचारी व आशाभगिनी यांचे मनोबल वाढले.
>
> - **डॉ. मेहबूब लुकडे,** वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणी काळभोर, (ता. हवेली)

### संक्षिप्त




## आळंदीत महिलेचा खून करणाऱ्या आरोपीला अटक

**आळंदी, ता. २३ :** आळंदी येथे आत्महत्येचा बनाव करून हत्या लपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुख्य आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. विष्णू महादेव पावडे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. आळंदी पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पार्वती दराडे आणि विष्णू पावडे यांच्यात मागील ६ महिन्यांपासून विवाहबाह्य संबंध होते. दोघेही एकत्र कामावर ये-जा करत असत. २० फेब्रुवारी रोजी ते कामानिमित्त बाहेर पडले असता सोळू गावाजवळील जंगल परिसरात थांबले. तेथे जेवताना दोघांमध्ये काही कारणावरून वाद झाला. या वादातून विष्णू पावडे याने संतापाच्या भरात पार्वती दराडे यांचा गळा आवळून खून केला.

## येरवड्यात महागड्या ४० कारसह २० दुचाकी खाक

**पुणे, ता. २३ :** पुण्यातील येरवडा परिसरात सोमवारी दुपारी लागलेल्या भीषण आगीने शहर हादरले. भूमी अभिलेख कार्यालयाजवळील मोकळ्या मैदानात उभ्या असलेल्या सुमारे ६० वाहनांना अचानक आग लागून ती पूर्णपणे जळून खाक झाली. यात अंदाजे ४० दुचाकी आणि २० चारचाकी वाहनांचा समावेश आहे. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास आग भडकली आणि काही मिनिटांतच तिने रौद्ररूप धारण केले. या जागेत पोलिसांनी जप्त केलेली तसेच पार्किंगसाठी ठेवलेली वाहने मोठ्या संख्येने उभी होती. आग कशी लागली हे अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी एक वाहन पेट घेताच शेजारील वाहनांना चटकन आग लागली. दाट धुराचे लोट दूरवरून दिसत होते. परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. आग इतकी तीव्र होती की वाहनांचे सांगाडे वाकडे-तिकडे झाले आणि अनेक गाड्या पूर्णपणे नष्ट झाल्या. माहिती मिळताच च्या अग्निशमन दलाच्या गाड्या आणि येरवडा अग्निशमन केंद्राचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पाण्याचे फवारे आणि विशेष उपकरणांच्या साहाय्याने काही तासांच्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणण्यात आली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाल्याचा अंदाज आहे.

# डोर्लेवाडीत संत तुकाराम बीज उत्सव साध्या पद्धतीने; करमणुकीचे सर्व कार्यक्रम रद्द

## अजित पवारांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांचा भावनिक निर्णय

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. २३ : देहूनंतर संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या बारामती तालुक्यातील डोर्लेवाडी येथे यंदाचा ६७ वा बीज उत्सव साध्या पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे गावात शोककळा पसरली असून त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा भावनिक निर्णय घेण्यात आला.




दरवर्षी ५ मार्च रोजी मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा होणारा संत तुकाराम महाराज बीज सोहळा यंदा मर्यादित स्वरूपात पार पडणार आहे. २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर बाराम ती तालुक्यात दुःखाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर डोर्लेवाडी येथील संत तुकाराम महाराज मंदिरात ग्रामस्थ व बीज उत्सव समि तीची विशेष बैठक घेण्यात आली. बैठकीत सर्वानुमते उत्सव साधेपणाने साजरा करण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

दुःखाच्या सावटाखाली आनंदोत्सव साजरा करणे उचित ठरणार नाही, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली. त्यानुसार रस्त्यावरील भव्य मंडप व्यवस्था, विद्युत रोषणाई, गावातील आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेली बैलगाडा शर्यत, मजेदार कुस्त्यांचा आखाडा तसेच सर्व सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.

दरम्यान, धार्मिक परंपरा अबाधित ठेवण्यात येणार असून सप्ताह, कीर्तन आणि इतर धार्मिक विधी सालाबादप्रमाणे पार पडतील. बीजेच्या दिवशी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले राहणार असून भक्तीमय वातावरणात कार्यक्रम पार पडतील.

अजितदादांच्या जाण्याने बाराम ती पोरकी झाली आहे. अशा वेळी जल्लोष करणे मनाला पटत नाही. म्हणूनच केवळ धार्मिक विधी पूर्ण करून उत्सव साध्या पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती डोर्लेवाडीतील उत्सव कमिटीने दिली.

# डोर्लेवाडीतील नागरिकांनी केली स्व. अजित पवारांच्या विमान अपघाताची निपक्षपाती चौकशीची मागणी

## सखोल तपास न झाल्यास व्यापक आंदोलनाचा इशारा

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. २३ : डोर्लेवाडी (ता. बारामती) येथे स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कथित विमान अपघातातील निधनाबाबत सखोल व निपक्षपाती चौकशी व्हावी, या मागणीसाठी सोम वारी (ता. २३) ग्रामस्थांनी कडकडीत बंद पाळत तीव्र निषेध नोंदविला. गावातील सर्व व्यवहार पूर्णपणे ठप्प ठेवून नागरिकांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

गेल्या महिन्यात झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाल्याची बातमी समोर आल्यानंतर राज्यभरात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. मात्र हा अपघात केवळ नैसर्गिक नसून त्याम ागे घातपाताची शक्यता असल्याचा संशय काही ग्रामस्थांकडून व्यक्त केला जात आहे. तपास प्रक्रियेला




अपेक्षित गती दिली जात नसल्याचा आरोप करत नागरिकांनी संतप्त भावना व्यक्त केल्या.

या पार्श्वभूमीवर डोर्लेवाडी ग्रामपंचायत कार्यालयासमोर निषेध सभा घेण्यात आली. सभेत वक्त्यांनी तपास यंत्रणांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पारदर्शक व वस्तुनिष्ठ चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी, अशी ठाम मागणी केली.

दरम्यान, ग्रामस्थांच्या वतीने तयार करण्यात आलेले निवेदन बारामती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. या निवेदनात उच्चस्तरीय चौकशी समि तीमार्फत तपास करण्यात यावा, अशी मागणी नमूद करण्यात आली आहे. योग्य व सखोल तपास न झाल्यास तीव्र व व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या बंदमध्ये ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

# हडपसर येथे तलवारीने केक कापणाऱ्या टोळक्याविरुद्ध गुन्हा

## समाज माध्यमात चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर कारवाई

**हडपसर ता. २३ :** भर चौकात वाढदिवस साजरा करताना तलवारीने केक कापणाऱ्या टोळक्या विरुद्ध वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हडपसरमधील शेवकर वस्ती परिसरात ही घडली. समाज माध्यमात तलवारीने केक कापतनाची चित्रफीत




प्रसारिर झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करुन शस्त्र बाळगणे, तसेच दहशत माजविल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.


भर चौकात तलवार, कोयत्याने केक कापून वाढदिवस साजरा करणाऱ्यांविरुद्ध यापूर्वी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्या टोळक्याविरुद्ध थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. १८ फेब्रुवारी रोजी वानवडी पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी अमोल गायकवाड यांनी समाज माध्यमात प्रसारित झालेली चित्रफीत पाहिली. तलवारीने केक कापून दहशत माजवित असल्याचे दिसून आले. त्यानंतर वानवडी पोलिसांच्या पथकाने टोळक्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा हडपसर भागातील शेवकर वस्ती परिसरात १७ फेब्रुवारी रोजी तलवारीने केक कापून टोळक्याने केक कापून वाढदिवस साजरा केल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी परिसरातील नागरिकांकडे चौकशी केली. तेव्हा टोळक्याने तलवारीने केक कापून दहशत माजविल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करुन टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल कला. भर चौकात तलवारीने वाढदिवस साजरा करुन वाढदिवस साजरा करणाऱ्या टोळक्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब जाधव यांनी दिला आहे.

# हवेली पंचायत समितीच्या गटनेतेपदी युवराज वांजळे; सभापतीपदाच्या राजकारणाला वेग

**लोणी काळभोर, ता. २३ :** हवेली तालुका पंचायत समितीच्या सत्तासमीकरणात नवे राजकीय वारे वाहू लागले असून खानापूर गणाचे सदस्य युवराज नारायण वांजळे यांची गटनेतेपदी निवड झाल्याने तालुक्यातील राजकारणात मोठी कलाटणी मिळाली आहे. या निवडीमुळे आगामी सभापतीपदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून राजकीय हालचालींना वेग आला आहे.

सोमवारी पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयात झालेल्या बैठकीत सर्वानुमते वांजळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष सुरेश घुले, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामठे, माजी उपाध्यक्ष शुक्राचार्य वांजळे, राष्ट्रवादीचे हवेली तालुकाध्यक्ष दिली वाल्हेकर, नवनिर्वाचित सदस्य युवराज काकडे, मनोज ऊर्फ कृषिराज चौधरी, कोमल कांबळे, सुषमा मुरकुटे, अमोल टेकाळे, विद्या गायकवाड, कदमवाकवस्तीचे माजी सरपंच नंदू काळभोर, यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हवेली पंचायत समितीच्या एकूण १२ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) ने सर्वाधिक ६ जागांवर विजय



मिळवला आहे. तर भारतीय जनता पक्ष ला ४, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) ला १ जागा मिळाली असून १ उमेदवार अपक्ष म्हणून विजयी झाला आहे. अपक्ष सदस्य विद्या गायकवाड यांनी राष्ट्रवादीला उघड पाठिंबा दिला असून शिवसेनेच्या सदस्याकडूनही मूक पाठिंबा मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीने बहुमताचा मॅजिक फिगर पार केल्याचे स्पष्ट झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर हवेली पंचायत समितीचा पुढील सभापती राष्ट्रवादीचाच होणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. मात्र सभापतीपदासाठी पक्षांतर्गतच चुरस वाढली आहे. थेऊर गणातील विजयी सदस्य युवराज काकडे आणि कोरेगाव मूळ गणातील मनोज ऊर्फ कृषिराज चौधरी हे दोघेही प्रमुख दावेदार म्हणून समोर आले आहेत.

काकडे हे विकासकामांचा अनुभव आणि स्थानिक जनाधार यावर भर देत सभापतीपदासाठी जोरदार लॉबिंग करत आहेत. तर चौधरी यांनी संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांच्या पाठबळावर दावा मजबूत केल्याची चर्चा आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतच मैत्रीपूर्ण स्पर्धा निर्माण झाली असून पडद्याम ागील बैठका, फोनाफोनी आणि राजकीय गणिते वेगाने बदलताना दिसत आहेत.

दरम्यान, गटनेतेपदी युवराज वांजळे यांची झालेली निवड ही आगामी सत्तासमीकरणाची नांदी मानली जात आहे. त्यामुळे हवेली तालुक्याच्या राजकारणाचे तापमान वाढले असून येत्या काही दिवसांत सभापतीपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.